पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील संपादित केलेल्या जमिनीसाठी 12.5 टक्के प्रमाणे जमीन परतावा मंजूर करण्याबाबत..

---

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक पीसीएन 1089/228/प्र.क्र.31/नवि-22

मंत्रालय, मुंबई-400 032.

दिनांक 3 मार्च 1990.

प्रस्तावना :- पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामध्ये सुमारे 1920 हेक्टर जमीन संपादित करावयाची होती. त्यापैकी सुमारे 700 हेक्टर जमीन प्राधिकरणाकडे प्रत्यक्षात आलेली आहे. उर्वरीत सुमारे 1151 हेक्टर जमीन ताब्यात घेण्याचे दृष्टीने भूसंपादनाच्या कायद्यानुसार निवाडे जाहीर झालेले आहेत भरपाईपोटी द्यावयाची रक्कम देखील जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात आलेली आहे. परंतु असे असतांना देखील, सुमारे 1151 हेक्टर जमिनीचा ताबा प्राधिकरणास अद्यापही प्रत्यक्ष मिळावयाचा आहे. वरील संपादित जमिनी शक्य तेवढ्या लवकर ताब्यात घेण्याचे दृष्टीने व प्राधिकरणाच्या कामास चालना मिळण्याचे दृष्टीने कोणती उपाययोजना करता येईल हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. भूसंपादनाच्या नियमानुसार द्यावयाची नुकसान भरपाई देऊन देखील या नागरीकरणामुळे ज्यांच्या जमिनी संपादन केल्या जाणार आहेत त्या नागरिकांना त्या भागात स्थायिक होऊन नागरीकरणामध्ये सहभाग घेता यावा या दृष्टीने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :- त्यानुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणात संपादित खातेदाराने तसा विकल्प दिल्यास, प्राधिकरणाने 87.1/2 टक्के एवढ्या संपादित जमिनीची विहित नुकसान भरपाई दिल्यानंतर व खातेदाराने संपादित करावयाची संपूर्ण जमीन प्राधिकरणाच्या ताब्यात प्रत्यक्ष दिल्यानंतर 12.5 टक्के अविकसित जमीन प्राधिकरणाने खातेदाराला द्यावी. अशाप्रकारे ताब्यात आलेली जमीन ही प्राधिकरणाच्या मालकीची होणार असल्याकारणाने 12.5 टक्के प्रमाणे द्यावयाची जमीन प्राधिकरणाच्या डिस्पोजल ऑफ लँड रेग्युलेशन 1973 च्या नियमाधीन असेल व अशा जमिनीचे वाटप प्राधिकरणाने करावयाचे आहे. खातेदारांना वरीलप्रमाणे द्यावयाची 12.5 टक्के जमीन ही एकत्रितपणे निवासी क्षेत्रात, शक्य असल्यास त्या खेड्याच्या लगतच्या भागात असावी. वरीलप्रमाणे खातेदारांना दिलेली अविकसित जमीन विकसित करण्याची जबाबदारी त्या त्या खातेदाराची राहील. अशी दिलेल्या जमिनीवरील ले-आऊट तयार करुन त्यास प्राधिकरणाची मान्यता घेण्याची जबाबदारी खातेदारावर राहील. अशा सर्व जमिनीवर पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे नियंत्रण राहील.

2. ही योजना, खातेदारांनी संपादित जमिनीचा मोबदला अंतिमतः स्विकारुन जमिनी प्राधिकरणाच्या ताब्यात दिलेल्या आहेत. त्यांच्या बाबतीत भूसंपादनाची कारवाई पूर्ण झालेली असल्याकारणाने, त्यांना लागू होणार नाही. मात्र, ही योजना पुढे संपादीत करावयाच्या जमिनीच्या बाबतीत लागू असेल.

3. 12.5 टक्के एवढ्या जमिनीचे केलेले वाटप नागरी जमीन (कमाल मर्यादा व नियमन) अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहील. म्हणजेच वाटप केलेली जमीन जर या अधिनियमातील तरतुदीनुसार कमाल मर्यादेपेक्षा अधिक असेल तर अशा अतिरिक्त जमिनीला सूट (एक्झम्शन) मिळविण्यासाठी खातेदारास विहित तरतुदीनुसार गृहनिर्माण योजना सादर करुन अर्ज करावा लागेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/- x x x

( व्ही. पी. राजा )

महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, पिंपरी, पुणे.